जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●



प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933



रविवार दि.१ मार्च २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : १९९ किंमत २ रुपये 7499615933


# नांदेड-परभणी जिल्ह्यात पोलिसांची धडक कारवाई

## मटका व जुगार अड्ड्यांवर छापे, २५ आरोपी ताब्यात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । अनिल पाटील तेलंग**

अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी पोलिस उपमहानिरीक्षक यांच्या विशेष पथकाने नांदेड व परभणी जिल्ह्यात धडक कारवाई करत मटका व जुगार अड्ड्यांवर छापे टाकले. या कारवाईत एकूण २५ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम व साहित्य जप्त करण्यात आले आहे.पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड शहरातील भाग्यनगर परिसरात २७ फेब्रुवारी रोजी छापा टाकण्यात आला. भाग्यनगर पोलीस ठाणे हद्दीत सुरू असलेल्या मटका व्यवसायावर कारवाई करत पोलिसांनी २४ हजार ३३० रुपयांची रोख रक्कम, चार मोबाईल फोन, लेनोवो कंपनीचा टॅब तसेच इतर साहित्य असा एकूण ७९ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी सात आरोपींना ताब्यात घेऊन महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कपनीचा टब तसच इतर साहित्य असा एकूण ७९ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी सात आरोपींना ताब्यात घेऊन महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.त्यानंतर २८ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्ह्यातील



ताडकळस पोलीस ठाणे हद्दीतील मौजे लिमला येथे असलेल्या राजकला क्रीडा व सांस्कृतिक मंडळावर छापा टाकण्यात आला. येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर कारवाई करत १८ जणांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून २० हजार ९०० रुपयांची रोख रक्कम व दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले. या ठिकाणी जुगारासोबतच देशी दारू व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आल्याने संबंधितांविरुद्ध मुंबई जुगार कायदा व इतर संबंधित कायद्यांनुसार गुन्हे नोंद करण्यात आले असून पुढील तपास ताडकळस पोलीस ठाणे करीत आहे.

या कारवाईत पोलिस उपनिरीक्षक पंकज इंगळे, पोलीस अंमलदार प्रदीप खानसोळे, गणेश धुमाळ, संजीव जिंकलवाड, कामाजी गवळी यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला. उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे. दरम्यान, नागरिकांनी आपल्या परिसरातील अवैध व्यवसायांची माहिती जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा पोलिसांच्या अधिकृत हेल्पलाईनवर देऊन सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

# मुंगुसवाडे येथे आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांचे जाहीर व्याख्यान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

ग्रामविकासासाठी गावाचा सक्रिय सहभाग या विषयावर आदर्श सरपंच श्री. भास्करराव पेरे पाटील यांचे जाहीर व्याख्यान मुंगुसवाडे ता. पाथर्डी येथे आयोजित करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्शगाव पाटोदा येथील माजी सरपंच म्हणून ओळख असलेल्या पेरे पाटील यांचे मार्गदर्शन ऐकण्याची संधी तालुक्यातील नागरिकांना मिळणार आहे.

सोमवार दि. ०२ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता महादेव मंदिर, मुंगुसवाडे ता. पाथर्डी जि. अहमदनगर येथे हा कार्यक्रम होणार आहे. ग्रामविकास, स्वच्छता, पारदर्शक कारभार, लोकसहभागातून विकासकामे कशी राबवावीत याबाबत पेरे पाटील बहुमूल्य मार्गदर्शन करणार आहेत.

या जाहीर व्याख्यानाचे आयोजन आजिनाथ भाऊ खेडकर मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले असून, परिसरातील ग्रामस्थ, युवक, महिला बचतगट सदस्य, लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.




# गोदावरी नदी पात्रातील अवैध रेती वाहतूक प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड ।अनिल पाटील तेलंग**

गोदावरी नदी पात्रातून अवैधरित्या रेती उपसा करून वाहतूक करणाऱ्या रेती माफियाविरोधात नांदेड ग्रामीण पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल २० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आज पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस पथक ज्यात पोलीस उप निरीक्षक व्यंकट कुसमे, पोलीस अंमलदार वसंत केंद्रे, शंकर माळगे, मारोती पंचलिंग, समीर अहेमद हे पेट्रोलिंग करत असताना २८ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार असर्जन नाका, भगतसिंग चौक परिसरात



सापळा रचण्यात आला. यावेळी रेतीने भरलेला हायवा (क्र. चझ-२६ क्ष-३१९२) संशयास्पदरीत्या येताना आढळून आला. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये अंदाजे ५ ब्रास रेती आढळून आली. वाहन चालकाने आपले नाव रूपेश नरहरी धुतराव (रा. जानापुरी, ता. लोहा) असे सांगितले तर हायवा मालक पप्पू पावडे (रा. नांदेड) असल्याचे निष्पन्न झाले. रेती वाहतुकीचा कोणताही वैध परवाना नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी पंचांसमक्ष वाहनासह रेती जप्त केली. या कारवाईत हायवा वाहन – अंदाजे किंमत २०,००,० रेती (५ ब्रास) – अंदाजे किंमत २५,००० असा एकूण २०,२५,००० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील संबंधित कलमान्वये नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आंबा उत्पादकांना तातडीने नुकसान भरपाई द्या–आमदार विलास भुमरे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

मागील काळात पडलेल्या थंडीचा फटका राज्यभरात आंबा उत्पादनास बसणार आहे ही बाब लक्षात घेता अंबा उत्पादक बागातदारांना तातडीने नुकसान भरपाई जाहीर करावी अशी मागणी आमदार विलास भुमरे यांनी फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्याकडे निवेदन द्वारे केली आहे शासनाने काही भागातील आंबा उत्पादकांना नुकसान भरपाई देण्याच्या निर्णय घेतल्याबद्दल शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत असले तरी उर्वरित राज्यातील उत्पादकांनाही समान न्याय द्यावा

मात्र यंदा डिसेंबर महिन्यापासून सलग तीन महिने तीव्र थंडी कायम राहिल्याने अंबामोहावर विपरीत परिणाम झाला ढगाळ वातावरण सततची थंडी धुके व आद्रकतेमुळे परागीभवन व्यवस्थित न झाल्याने सुमारे ९०% भागातील मोहर करपून



गेला आहे आंबा बागामधून साधारणपणे एकरी सहा ते सात टन उत्पादन अपेक्षित असते मात्र यंदा ते घटून केवळ दीड ते दोन टनावर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे परिणामी बागातदारांचे कोट्यावधी रुपयाचे नुकसान होण्याचा अंदाज आहे ह्या बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून राज्य शासनाने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना तातडणे आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी आमदार भुमरे यांनी नियोजनाद्वारे फ्लोत्पादन मंत्री गोगावले यांच्याकडे केली.

# जैन इंग्लिश स्कूल, पाचोड येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

पाचोड येथील जैन इंग्लिश स्कूल मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात साजरा करण्यात आला. विज्ञानाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, संशोधन वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती तृप्ती सचिन पंडित उपस्थित होत्या. त्यांच्या शुभहस्ते रिबन कापून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शाळेचे अध्यक्ष मा. श्री. जयकुमार बाकलीवाल सर तसेच अक्षय




बाकलीवाल, सलोनी बाकलीवाल, काजल बाकलीवाल आणि शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सविता वंटगिरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विज्ञानावर आधारित विविध आकर्षक व नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. यामध्ये एरोप्लेन पॅसेंजर सेफ्टी, स्मार्ट इरिगेशन सिस्टम, सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट, वॉटर मॅनेजमेंट, स्मार्ट सिटी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डी.जे. साऊंड सिस्टम, ऑरगॅनिक फार्मिंग, मानवनिर्मित वातावरण, इंधन निर्मिती, सोलार सिस्टम आदी प्रकल्पांचा समावेश होता. प्रत्येक प्रकल्पामध्ये विद्यार्थ्यांनी सर्जनशीलता, तांत्रिक समज आणि संशोधनाची झलक प्रभावीपणे सादर केली.या प्रसंगी शाळेचे संचालक सुयोग बाकलीवाल यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषणात सांगितले की उपक्रमामागील मुख्य उद्देश विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देणे, त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे आणि त्यांच्या अंगीभूत कलागुणांचा विकास साधणे हा होता. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यास निश्चितच मदत होते.या प्रसंगी कविता इंगळे, योगिता वाघ, पूजा घुले, ऋतुजा गव्हाणे, रामकोर डांगे, अहिल्या भोजने, वैष्णवी वैष्णव, कोमल जायभाये, अपेक्षा भुमरे, चैतन्य नाझरकर, राजेंद्र जाधव, शुभम काटे, रोहित गायकवाड, मनोज चाबुकस्वार, श्रीनाथ शेळके आदी शिक्षकवृंद तसेच पालकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डोकेवाडी गावातील सुशिक्षित तरुणांनी गावकऱ्यांकडून लोकसहभागातून उभारलं भव्य खुले सभामंडप

**लोकसभागातून उभारण्यात आलेल्या खुल्या सभामंडपामध्ये पहिला मान मला मिळाला असून माझ्या मुलीचा विवाह गुरुवारी (ता.२६) रोजी संपन्न झाला. यामुळे माझा कलामंडपसाठी लागणारा खर्च वाचला असून माझा आर्थिक नुकसान टळले आहे.या तरुण सप्ताह कमिटीने अत्यंत चांगले काम केले आह**

**– नारायण आहेर**
**ग्रामस्थ, डोकेवाडी**

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भूम । रविंद्र लोमटे**

गावातील तरुण मंडळी एकत्र आल्यावर कोणतेही काम करु शकतात.शासनाच्या निधीतून अनेक काम होतात परंतु लोकसहभागातून हे सर्वात मोठं काम झाले आहे. यांच उदाहरण भूम तालुक्यातील डोकेवाडी गावात पाहवयास मिळालं आहे. या गावातील मागील दोन वर्षापासून सुशिक्षित , असे पंधरा नवयुवक मंडळ एकत्र आले त्यांनी एक कमिठी स्थापन केली. या कलयुगात देखील तरुणांनी भक्ती मार्ग स्वीकारत गावातील अखंड हरिनाम सप्ताह ची सर्व सूत्रे हाती घेतले. दोन वर्षात अत्यंत चांगल्या प्रकारे नियोजन करून सर्व गावकरी मंडळ नोकरदार ,व्यापारी, शेतकरी, शेतमजूर यांना विश्वासात घेऊन लोक सहभाग जमा केला. त्या जमा झालेल्या लोकसभागातून गावचा दोन वर्ष अखंड हरिनाम सप्ताह अत्यंत दिमागदार सोहळ्यामध्ये संपन्न झाला. मागील ५५ वर्षापासून गावामध्ये अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. परंतु कोणत्याही प्रकारची नवीन घडामोड होत नव्हती म्हणून तरुण एकत्र आले व लोकसभागातून झाली नसल्याने तरुणांनी एकत्र येऊन गावांमध्ये खुले भव्य असे लोकसभागातून सभागृह उभारली आहे. या सभागृहामध्ये गावातील सामान्य कुटुंबातील व्यक्तींना त्यांच्या धार्मिक कार्यासाठी विवाहासाठी उपयोगात येणार असल्याने गावकऱ्यांमध्ये एक उत्साहाचे आनंदाचे वातावरण आहे. असे तरुण एकत्र आले तर नक्कीच गावच्या विकासामध्ये भर टाकू शकतात अशीही चर्चा सर्वत्र आहे.शिल्लक रक्कम जिल्हा परिषद शाळेतील बहुतेक सुविधा साठी खर्च करावा ही मागणी गावकऱ्यांकडून होत आहे. डोकेवाडी च्या तरुणाचा आदर्श इतर गावातील तरुणांनी घ्यावा गावाच्या विकास कार्यात सहभागी व्हावे.



**सन – २०२४–२०२५ देणगी जमा १००८६०६–/ खर्च ६८६७८४ शिल्लक ३,२१,८२२–/ , सन २०२५–२०२६ देणगी जमा ९९,६६८५–/ खर्च ११,३५४६९–/ एकूण शिल्लक १९०,०००–/ पुढील विकास कामासाठी नुतन कमिठीकडे जमा करण्यात आली.**

**गावातील आम्ही सुशिक्षित तरुण मंडळी एकत्र येऊन गावचा सप्ताह हाती घेतला आणि दोन वर्षात लोक सहभागातून भव्य खुले सभामंडप उभारण्यात आले.यासाठी सर्व गावकऱ्यांचे नौकरदार, व्यापार, शेतकरी, शेतमजूर सर्वांचे सहकार्य लाभले आहे.**

**–महावीर जालन**
**(सप्ताह कमिठी सदस्य)**

# कोणताही नागरिक न्यायापासून वंचित राहू नये-न्यायमूर्ती धोटे

## भोकर येथील मेळाव्यात विविध सेवासाठी ५० स्टॉल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

संविधानानुसार समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळणे हा त्यांचा हक्क आहे. वंचित घटक मोफत न्याय व शासकीय योजनांपासून वंचित राहू नयेत, यासाठी विधी सेवा प्राधिकरणामार्फत सातत्याने शिबिरे आयोजित केली जातात. या महाशिबिराच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांपर्यंत कायद्याची माहिती व विविध शासकीय योजना पोहोचवाव्यात, असे आवाहन मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती निरज पी. धोटे यांनी केले.

विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, तालुका विधी सेवा समिती भोकर व अभिवक्ता संघ भोकर यांच्या संयुक्त विद्यमाने भोकर येथील हनुमान नगर, किनवट रोडवरील खुले मैदान येथे विधी सेवा महाशिबिर व शासकीय सेवांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता. न्यायमूर्ती नीरज धोटे यांच्या हस्ते वृक्षांना पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र ब्रम्हे, तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष मोहम्मद नासिर मोहम्मद सलीम, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेगशेट्टी, अभिवक्ता संघ भोकरचे अध्यक्ष पी. आर. त्रेपतवार यांच्यासह न्यायाधीश, विविध विभागांचे अधिकारी, विधीज्ञ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी बंजारा नृत्याचे सादरीकरण केले.

न्यायमूर्ती नीरज धोटे म्हणाले, शासन विविध कल्याणकारी योजना राबवित असले तरी अनेकांना त्यांची माहिती नसते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या मेळाव्यातील सर्व स्टॉलना भेट देऊन योजनांची माहिती घ्यावी व त्यांचा लाभ घ्यावा.

येत्या १४मार्च रोजी आयोजित लोकअदालतीत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी पक्षकार व विधीज्ञांनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

समान न्याय व आर्थिक समानता हा प्रत्येकाचा हक्क प्रमुख जिल्हा न्यायाधीश नरेंद्र ब्रम्हे

प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र ब्रम्हे यांनी संविधानातील कलम ३९ (अ) नुसार समान न्याय व आर्थिक समानता हा प्रत्येकाचा हक्क असल्याचे सांगितले. न्याय मागण्याची संधी प्रत्येकाला समान आहे. विधी सेवा प्राधिकरणाच्या विविध समित्यांमार्फत कायदेविषयक जनजागृती केली जाते. या महाशिबिराचा उद्देश वंचित घटकांना कायद्याची माहिती व शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा आहे. आपण या माध्यमातून कायदेशीर साक्षरते कडून कायदेशीर सक्षमते कडे वाटचाल करीत आहोत असे त्यांनी सांगितले.

यावेळी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष मोहम्मद नासिर, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अभिवक्ता संघ भोकरचे अध्यक्ष पी. आर. त्रेपतवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

मान्यवरांच्या हस्ते लाभांचे वितरण

महामेळाव्यात विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मदत व आदेशपत्रांचे वितरण करण्यात आले. तहसील कार्यालयामार्फत शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील वारसांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले. तसेच संजय गांधी निराधार योजना, प्रधानमंत्री आवास योजना, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बेबी केअर किट, कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर वितरण, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत प्रत्येकी दोन लाख रुपयांचे अनुदान आदींचे वितरण करण्यात आले. आरोग्य, शिक्षण व विद्युत विभागाकडूनही विविध प्रमाणपत्रे व लाभ देण्यात आले.

महामेळाव्यात विविध विभागांचे ५० स्टॉल उभारण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तदर्थ जिल्हा न्यायाधीश बी. यू. चौधरी व वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश ए. पी. कराड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिव शरद देशपांडे यांनी केले. कार्यक्रमानंतर मान्यवरांनी सर्व स्टॉलना भेट देऊन पाहणी केली.

## श्री हनुमान शिक्षण संस्थेच्या वतीने जिल्हा क्रीडाअधिकारी,तालुका क्रीडा अधिकारी आणि श्री नेताजी सावंत या त्रिमुर्तीचा सत्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जिवन जाधव । औसा**

लातूर जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हा क्रीडा अधिकारी मा. श्री.महादेवजी कसगावडे साहेब व कर्तव्यदक्ष तालुका क्रीडा अधिकारी तथा राज्य क्रीडा मार्गदर्शक मा.श्री. चंद्रकांतजी लोदगेकर साहेब यांनी हनुमान शिक्षण संस्था शिवली द्वारा संचलित श्री हनुमान विद्यालय शिवली या औसा तालुक्यातील नामांकीत शाळेस अचानक भेट देऊन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूरच्या वतीने देण्यात आलेल्या क्रीडांगण दुरुस्ती अनुदान,पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम अनुदान,आणि ओपन जिम करीता अनुदान देण्यात आले होते. या आर्थिक निधीचा यथोचित विनियोग करून विद्यार्थांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत किंवा नाही हे पाहण्यासाठी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी सदर शाळेस अचानक भेट देऊन तपासणी केली.याप्रसंगी क्रीडांगण दुरुस्ती,सुसज्ज पिण्याच्या पाण्याची टाकी, तसेच सर्व विद्यार्थ्यांना पिण्यायोग्य शुद्ध पाण्याची सुविधा,सुसज्ज ओपन जिम,सुसज्ज इमारत , विविध खेळाचे भव्य क्रीडांगण,क्रीडा साहित्य, आणि या मैदानावर खेळत असलेले अष्टपैलू व्हॉलेबॉलपट्टू , अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी साधलेला संवाद व प्रतिक्रीया पाहून,याच शाळेतील अनेक खेळाडू व्हॉलेबॉल व इतर खेळामध्ये विभागातून प्रथम क्रमांक पटकावून शालेय राज्यस्तरावर स्पर्धेत सहभागी झाल्याचे ऐकून आणि शाळेतील विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध अनेक भौतिक सुविधा,तसेच शासनाने दिलेल्या निधीचा यथायोग्य उपयोग केल्याचे पाहून जिल्हा क्रीडाअधिकारी व राज्य क्रीडा मार्गदर्शक तथा तालुका क्रीडा अधिकारी चंद्रकांतजी लोदगेकर साहेब यांनी समाधान व्यक्त केले.



तसेच याप्रसंगी हनुमान शिक्षण संस्थेचे सचिव मा.श्री.मोहनराव साळुंके आणि संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.डॉ.विजय माणिकराव जाधव यांच्या हस्ते कर्तव्यदक्ष जिल्हा क्रीडाअधिकारी महादेवजी कसगावडे साहेब,राज्य क्रीडा मार्गदर्शक तथा तालुका क्रीडा अधिकारी चंद्रकांतजी लोदगेकर साहेब आणि जालना जिल्ह्यातील अंबड येथे नुकत्याच झालेल्या शिक्षकांच्या राज्यस्तरीय सूर्यनमस्कार स्पर्धेत योग गुरु पतंजली योग समिती औसा तालुकाध्यक्ष,तथा मुफ्टा शिक्षक संघटना औसा तालुकाध्यक्ष श्री नेताजी सावंत सहशिक्षक श्रीराम माध्यमिक विद्यालय एरंडी - सारोळा ता.औसा, जि.लातूर यांनी महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावून लातूर जिल्ह्याला सुवर्णपदक मिळवून दिले बद्दल श्री नेताजी सावंत सर आणि वरील वरीष्ठ दोन अधिकारी या त्रिमूर्तीचा हनुमान शिक्षण संस्थेच्या वतीने व हनुमान विद्यालयाच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.या सत्कार प्रसंगी हनुमान विद्यालय शिवलीचे विद्यमान मुख्याध्यापक राजाभाऊ गाडेकर,माजी मुख्याध्यापक संदिपानजी माळी,तसेच शाळेतील विद्यार्थी,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाटोदा बु येथील स्वस्त धान्य दुकानदार विरुद्ध तक्रार चौकशी रस्त्यावर;मंडळी नाराज

# तीन महिन्यापासून चौकशी न झाल्याने गावकरी विचारेत



लोकनेता न्यूज नेटवर्क

**मांडवी । डॉ.भारत राठोड**

किनवट तालुक्यातील पाटोदा (बु) येथील स्वस्त धान्य दुकानदाराकडून स्वस्त धान्य दुकानसाठी तंटामुक्ती भवनाचा पाटोदा (बु) येथील स्वस्त धान्य दुकानदाराकडून रेशन धारकांना अनियमित धान्य पुरवठा करण्यात येतो दिलेल्या धान्याची पावती दिली जात सरकारमान्य स्वस्त धान्य दुकान

वापर केला जात आहे तसेच शासनाचे नियम पालन न करता रेशन धारकांना अनियमित धान्य देत असून स्वस्त धान्य दुकान परवाना रद्द करण्याची मागणी ग्रामस्थांने तहसीलदार यांचे कडे करण्यात आले होते पण तीन महिने लोटले तरी चौकशी करण्यात आली नसल्याने ग्रामस्थांकडून संतप्त झाल्याचे दिसून येत आहे.

नाही शासनाने दिलेल्या दरापेक्षा जास्त रुपये घेतल्या जाते प्रति कार्ड धारकांस एक किलो धान्य कमी दिला जातो रेशन दुकानात माहिती व भाव फलक लावलेला नाही त्या फलकावर नाव, दुकान क्रमांक, वेळ, सुट्टी चा दिवस, फोन नंबर, धान्य दर, उपलब्ध साठा, बी पी एल, अंतोदय ची माहिती बोर्डावर असणे अनिवार्य असताना

नियमाचे पालन केला जात नाही रेशन दुकानासाठी प्रयाप्त खोली नसून तंटामुक्ती भावनांचा दुकान म्हणून वापर केला जातहोता तक्रार देताचं तंटामुक्ती भवन रिकामी करण्यात आला हे सर्व गैर व्यवहार सरपंच यांच्या निदर्शनाखाली होत आहे असे गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे रेशन दुकाणावर देखरेख करण्यासाठी दक्षता समिती नेमणूक केली आहे परंतु सरपंच यांच्या दबावाखाली कर्तव्यात कसूर करत आहे या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून स्वतः धान्य दुकान परवाना रद्द करण्याची मागणी पाटोदा (बु) ग्रामस्थांनी तहसीलदार किनवट ऑपीस यांच्याकडे केली आहे.. लवकर खुलासा करण्यात यावा ही विनंती गावकरी करत आहे...

# पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कुल मुलींचे मुखेड येथे विज्ञान प्रदर्शन व सी.व्ही.रमण सन्मान दिवस उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्याच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाला वाव देनारा एक उतकृष्ट उपक्रम-संजय यलमवाड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिल्पा डावकरे । मुखेड**

मुखेड पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कुल मुलींचे मुखेड येथे राष्ट्रीय विज्ञान दिनाचे व सी.व्ही.रमण सन्मान दिवसाचे औचित्य साधून विज्ञान प्रदर्शन व राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शन सोहळा नुकताच संपन्न झाला.सदरिल विज्ञान मेळाव्याचे उदघाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.संजय यलमवाड व दैनिक श्रमिक लोकराज्यचे संपादक ज्ञानेश्वर डोईजड यांच्या हस्ते करन्यात आले.या वेळी प्रमुख पाहुने म्हणून दैनिक पुढारी वृत्तपत्राचे तालुका प्रतिनिधी अविनाश देशमुख,शिक्षणविस्तार अधिकारी यु.पी.चव्हाण सर,सांस्कृतिक विभाग प्रमुख दिलीप देवकांबळे सर,एस.बी.राजपुत सर,दिपक लोहबंदे सर,सुधीर रॅपनवाड,सुधाकर चव्हाण,नितीन तलवारे,उपस्थित होते.विज्ञान मेळावा या उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक कल्पकता आणि सुप्त गुणांना व्यासपीठ मिळाले असून मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांनी प्रयोगांतून उलगडले विज्ञानाचे महत्त्व





या प्रदर्शनात शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोगांचे प्रात्याक्षिकासह त्यामागील शास्त्रीय तत्त्वे समजावून सांगितली.इयत्ता पहिली ते नव्वीच्या एकून १६१ विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवत ८२ विविध नाविन्यपूर्ण प्रयोग सादर केले.यात उल्लेखनिय प्रयोग पाण्याची घणता,पाण्यातील दिवे,वनस्पतीचे अवयव,श्वसनास जुळक्षरपलहळ अवशक्ता,हवेच्या दाबाचा परिणाम,मानवी शरिर अवयव,ज्वालामुखी उद्रेक,मानवी शरिरातील अंतंद्रीय,प्रकाशसंश्लेशन,पवन उर्जा,पाण्यावरिल विज निर्मिती,स्वंयचलित पथदिवे,रासायणिक अभिक्रीया,जलशुद्धिकरन,भुकंप मापन यंत्र,चंद्रायान सारखे प्रयोग पाहून उपस्थित पालक व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या या प्रयोगांचे विशेष कौतुक केले.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.संजय यलमवाड यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला असून, यावेळी विज्ञान विभागाचे प्रमुख एस.बी.राजपुत सर,सौ.अश्विनी कुलकर्णी मॅडम,देशपांडे मॅडम,अंकाडे सर,व्यंकटी केंद्रे सर,हरी भालेराव सर,सुधीर शृंगारे सर,हरीदास पवार सर,दुरनाळे सर, यांची उपस्थिती होती. मान्यवरांनी विज्ञान मेळाव्यातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या,प्रयोग प्रात्याक्षिक,४८ विद्यार्थीनीनी किडनीची संरचना,र्हदयाची रचना या सारख्या संदेश देनार्या रांगोळी,जगप्रसिद्ध ५२ शास्त्रज्ञांचे फोटो व कार्ये असलेले पोष्टर प्रदर्शनाची पहाणी करून समाधान व्यक्त केले व सर्वांना विज्ञान दिनाच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य व सी.व्ही.रमण यांच्या जयंती निमित्त आयोजित विज्ञान मेळावा यशस्वी करण्यासाठी विज्ञान विषयाचे विभाग प्रमुख एस.बी.राजपुत सर,सांस्कृतिक विभाग प्रमुख दिलीप देवकांबळे सर,अश्विनी कुलकर्णी मॅडम,अशालता स्वामी मॅडम,देशपांडे मॅडम,येवतीकर मॅडम,गडगिळे मॅडम,सौ.कदम मॅडम,मठपती मॅडम,दिनकर मॅडम,मुपडे मॅडम,संगिता माळगे मॅडम,सौ.शेटकार मॅडम,पाटील मॅडम, कुमुटकर मॅडम,धनशेट्टी मॅडम,अंबादास देशमुख सर,मुद्देवाड सर,सौ.लोणीकर मॅडम,भवानीसिंह चौहाण सर,जिवन वडजे सर,अकबर सर,चंद्रकांत डावकरे सर,यांनी विशेष परिश्रम घेतले.हा सोहळा विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीस तसेच त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला, अशी भावना यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय यलमवाड सह दैनिक लोकमतचे पत्रकार चंद्रशेखर पाटील,यांनी व्यक्त केली.

# वाडा तालुक्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पालघर । श्री तुषार भोईर**

वाडा - वाडा तालुक्यात महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र मराअ-२०२६/प्र.क्र. ०९/समन्वय-१ दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी स्तरावर निकाली काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी वाडा तालुक्यामध्ये सर्व मंडळ स्तरावर एकदिवसीय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान या शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.

शिबीराचे वेळापत्रक खालील प्रमाणे

शनिवार, दि.०७ मार्च २०२६ ग्रामपंचायत कार्यालय कुडूस.

सोमवार, दि.०९ मार्च २०२६ ग्रामपंचायत कार्यालय मांडवा.

शनिवार, दि. १४ मार्च २०२६ ग्रामपंचायत कार्यालय हमरापूर

शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ ग्रामपंचायत कार्यालय कोने.

शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय घोणसई-मेट.

शुक्रवार, दि. ०८ मे २०२६.

गणेश मैदान वाडा.

शुक्रवार, दि. १५ मे २०२६

ग्रामपंचायत कार्यालय खानिवली.

सदर शिबीरामध्ये नागरिकांच्या प्रलंबित फेरफार प्रकरणंचा तात्काळ निपटारा, ७/१२ व ८अ उत्ताऱ्यातील त्रुटी दुरूस्ती, डीजीटल ७/१२ उताऱ्याचे वितरण व मार्गदर्शन, उत्पन्न, रहिवासी, जात. नॉन-क्रीमोलिअर इ. प्रमाणपत्रांचे वितरण, सामाजिक अर्थसहाय्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ देणे, एक खिडकी पद्धतीद्वारे (डळपसश्रश थळपवु ड्रीशा) अकृषीक तरतुदींबाबत जनजागृती व एकवेळ अधिमूल्य याबाबत मार्गदर्शन ई-मोजणी, पी एम किसान, अँग्रीस्टॅक योजना, नोंदणीकृत दस्ताबाबत कार्यावाही, सर्वांसाठी घरे. तुकडेबंदी कायद्याच्या अनुषंगाने कार्यवाही व तक्रार निवारण सेवा या सेवांचा समावेश आहे.

तरी वाडा तालुक्यातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे की, आपण आवश्यक कागदपत्रांसह शिबीरास उपस्थित रहावे. प्रलंबित अर्ज असल्यास त्याची माहिती सोबत आणावी. डीजीटल सेवा वापरासंदर्भात मार्गदर्शन घेण्यासाठी मोबाईल क्रमांक सोबत ठेवावा. या समाधान शिबीराचा लाभ घ्यावा व आपल्या महसूल तक्रारींचे त्वरीत निराकरण करुन घ्यावे. असे आवाहन वाडा तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी केले आहे




# श्री दत्त महाविद्यालय हदगांव येथे मराठी भाषा गौरव दिन संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगांव । चंद्रकांत भोरे**

हदगाव तालुका शिक्षण प्रसारक मंडळ हदगाव संचलित श्री दत्त कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हदगाव जिल्हा नांदेड येथे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ डी . एस.काकडे यांच्या हस्ते 'मराठी भाषा गौरव दिन ' निमित्ताने ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करुन 'मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मराठी विभागातील प्रा. राजेश राऊत सर यांनी आपल्या भाषणात मराठी भाषा ही आपुली बोली आहे, आपली मातृ भाषा आहे आणि मराठी भाषा आपुला बाणा आहे . म्हणून प्रत्येक मराठी नागरिकाला अभिमान वाटावा असा हा मराठी भाषा गौरव दिन आहे. ज्येष्ठ कवी, व लेखक वि. वा. शिरवाडकर ( कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी हा दिवस महाराष्ट्रात ' मराठी भाषा गौरव दिन ' म्हणून साजरा केला जातो. प्रत्येक मराठी माणसाच्या अभिमानाचा, मराठी संस्कृती आणि साहित्याचा हा गौरव दिन आहे. मराठी अभिजात भाषेचे संवर्धन करण्यासाठी या दिवसाला विशेष महत्व आहे. मराठी भाषेत अमाप लेखन झालं आहे. विविध लेखक, कवींनी त्यांच्या साहित्याने ही भाषा समृद्ध केली आहे. त्याच प्रमाणे ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त लेखक वि. वा. शिरवाडकर यांचे मराठी साहित्यातील स्थान महत्त्वाचे आणि प्रशंसनीय आहे. असे मत मांडले. श्री दत्त महाविद्यालयातील 'मराठी भाषा विभागाच्या वतीने' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कार्यालयीन अधीक्षक कैलासराव वानखेडे व सर्व कर्मचारी यांनी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमास विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# गोरबंजारा लोकक्रांती सेनेच्या यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी ॲड.जाधव यांची निवड

## संघटनेच्या बळकटीसाठी नव्या नेतृत्वावर विश्वास-ॲड.विजयकुमार पवार यांची घोषणा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**यवतमाळ । प्रतिनिधी**

गोरबंजारा समाजाच्या हक्कांसाठी आणि सामाजिक, शैक्षणिक उन्नतीसाठी कार्यरत असलेल्या गोरबंजारा लोकक्रांती सेनेच्या यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी ॲड.पवन जाधव यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे. ही निवड संस्थापक अध्यक्ष ड. विजयकुमार बबीराम पवार (झरबला), महासचिव सुनिता प्रकाश राठोड, वाशिम जिल्हाध्यक्ष पंकज चव्हाण तसेच इतर सर्व पदाधिकाऱ्यांशी सविस्तर विचारविनिमय करून एकमताने करण्यात आली.

संघटनेच्या ध्येय-धोरणांशी प्रामाणिक राहून समाजातील तरुणांना संघटित करणे, शिक्षण, रोजगार, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक जतन यासाठी प्रभावी काम करण्याच्या दृष्टीने ही निवड करण्यात आल्याचे संस्थापक अध्यक्ष ॲड.विजयकुमार पवार यांनी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, गोरबंजारा समाजाच्या प्रश्नांवर कायदेशीर आणि संघटनात्मक पातळीवर भक्कम लढा उभारण्यासाठी सक्षम नेतृत्वाची गरज होती. ॲड.पवन जाधव यांची निवड ही त्याच दिशेने उचललेले ठोस पाऊल आहे.




नवीन जिल्हाध्यक्ष ड. पवन जाधव यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, संघटनेने दिलेल्या जबाबदारीचे भान ठेवून यवतमाळ जिल्ह्यात संघटनेची मजबूत बांधणी करणे, गावपातळीवर शाखा स्थापन करणे, तरुणांना कायदेविषयक मार्गदर्शन करणे आणि गोरबंजारा संस्कृतीचे जतन करण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे, हा त्यांचा प्राधान्यक्रम असेल.

महासचिव सुनिता राठोड यांनीही या निवडीचे स्वागत करताना सांगितले की, संघटनेची वाटचाल अधिक प्रभावी आणि संघटित पद्धतीने पुढे नेण्यासाठी सक्षम आणि अभ्यासू नेतृत्वाची गरज आहे. ॲड.पवन जाधव यांच्या निवडीमुळे यवतमाळ जिल्ह्यात संघटनेची ताकद निश्चितच वाढेल.

या प्रसंगी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी नवनियुक्त जिल्हाध्यक्षांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. लवकरच यवतमाळ येथे कार्यकर्त्यांची बैठक घेऊन आगामी कार्यक्रमांची रूपरेषा जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. गोरबंजारा समाजाच्या हक्कांसाठी, संविधानिक मान्यतेसाठी आणि सामाजिक परिवर्तनासाठी संघटना अधिक जोमाने कार्य करेल, असा विश्वास सर्व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला

# आज टाकळी येथे व्हि.जी.रेड्डी यांच्या स्मारकचा उद्घाटन सोहळा

## समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे भारतीय लहुजी सेनेचे नम्र आवाहन



लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील आपल्या समाजासह सर्वपक्षीय राजकीय पुढारी व अनेक क्षेत्रातील अधिकारी कर्मचारी आणि पोलीस प्रशासन यांना आपल्या नावासह आपल्या लढाऊ संघटनेची ओळख निर्माण करून देणारे भारतीय लहुजी सेनेचे सेनाप्रमुख व्ही.जी रेड्डी यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त नायगाव तालुक्यातील मौजे टाकळी बु. येथे त्यांच्या जन्म गावी स्मारकाचे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा आज होणार आहे.

अन्याय जुलूम के टक्कर मे संघर्ष हमारा नारा है... हे ब्रीदवाक्य सोबत घेऊन भारतीय लहुजी सेना या लढाऊ संघटनेची स्थापना करून तालुक्यातील मौजे टाकळी बुद्रुक येथील लढवया नेता व्ही जी रेड्डी यांनी महाराष्ट्रात मध्ये जय लहुजी चा नारा रुजविला व जिथे अन्याय अत्याचार होतो तिथे जाऊन आक्रमक भूमिका बजावली आणि आपल्या भारतीय लहुजी सेनेत असंख्य कार्यकर्ते निर्माण केले यामुळे सबंध महाराष्ट्रामध्ये या संघटनेची धास्ती निर्माण झाली होती अशा झुंजार व लढवया व्ही. जी रेड्डी या नेत्याचे गतवर्षी निधन होऊन ते अमर झाले त्यांची प्रेरणा व आदर्श पुढे ठेवून त्यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून व्ही.जी रेड्डी यांची जन्मभूमी असलेल्या मौजे टाकळी बु येथे आज दिनांक एक मार्च रोजी त्यांच्या भव्य स्मारकाचा उद्घाटन सोहळा समाज बांधवाकडून व भारतीय लहुजी सेनेच्या वतीने आयोजन केले असून या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मा.आ.अविनाश घाटे उद्घाटक मा.आ. सुधाकर भालेराव उदगीर व प्रमुख उपस्थितीमध्ये खा.रवींद्र पाटील चव्हाण,आ.जितेश अंतापुरकर, स्वप्निल चव्हाण,आ.राजेश पवार,विष्णू भाऊ कसबे,डॉ. रामचंद्र भरांडे,कैलाश कंधारे, पी.एस मोतेवाड, नारायण गायकवाड,उमेश पवळे,गंगाधर कोतेवार यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे मौजे टाकळी तालुका नायगाव येथे दिनांक एक मार्च २०२६ रविवार रोजी या कार्यक्रमाचे आयोजन केले असून सकाळी दहा वाजता शाहीर बापूराव जमदाडे यांचा महापुरुषांच्या जीवन कार्यावरील गीताचा कार्यक्रम तर ठीक बारा वाजता मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये व्ही. जी रेड्डी यांच्या स्मारकाचे उद्घाटन होणार आहे तरी या सोहळ्यास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे नम्र आवाहन भारतीय लहुजी सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी रंगराव पाटील कृषी उत्पन्न खाजगी बाजार समिती वचनबद्ध-भास्करराव पाटील

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर (एल पी उगीले)**

उदगीर शहर महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रा, तेलंगणाच्या सीमेवर असल्यामुळे बाजारपेठ मोठी आहे. या बाजारपेठेमध्ये शेतमाल ही मोठ्या प्रमाणात येत असतो. शासनाच्या सतत बदलत जाणाऱ्या धोरणामुळे आणि व्यापाऱ्यांच्या भूमिकेमुळे शेतमालाला म्हणावा तसा भाव मिळतोच असे नाही. शेतकऱ्यांच्या शेतमालाला किमान हमीभाव मिळाला पाहिजे. हा दृष्टिकोन ठेवून सहकार महर्षी शिवाजीराव गुरुडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहकार्याने रंगराव पाटील कृषी उत्पन्न खाजगी बाजार समिती स्थापन करण्यात आली. शेतकऱ्यांचे हित हेच उद्दिष्ट ठेवून या बाजार समितीच्या माध्यमातून आज पर्यंत कार्य करत आलो आहोत, भविष्यात ही शेतकरी, व्यापारी, हमाल, मापाडी या सर्वांचे हित जोपासत शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. हे धोरण ठेवून आम्ही





काम करणार आहोत .आमचे सर्व संचालक मंडळ आमच्या या धोरणाशी सहमत आहेत, असे विचार रंगराव पाटील कृषी उत्पन्न खाजगी बाजार समितीचे संस्थापक तथा संचालक भास्करराव पाटील यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

रंगराव पाटील कृषी उत्पन्न खाजगी बाजार समितीच्या वतीने शासनाच्या कृषी धोरणानुसार शासनमान्य हमीभाव खरेदी केंद्रावर नाव नोंदणी करण्याचे आणि नाफेड तर्फे चना खरेदी केंद्र या बाजार समितीने सुरू केले असून हरभऱ्यासाठी ५८७५ प्रतिक्विंटल हमीभाव असल्याने शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. या हमीभाव खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील उत्पन्नाच्या संदर्भामध्ये नोंदणी करण्यासाठी कॉम्प्युटर चना पेरा असलेला सातबारा व पीक पेरा तसेच आधार कार्ड चे झेरॉक्स, बँक खाते पासबुकचे झेरॉक्स, खाते नंबर आधारशी लिंक केलेला असावा. ही कागदपत्रे घेऊन शेतकऱ्यांनी नोंदणीसाठी स्वतः खरेदी केंद्रावर उपस्थित राहावे. असेही आवाहन या बाजार समितीचे संस्थापक तथा ज्येष्ठ संचालक शिवाजीराव गुरुडे, भास्करराव पाटील यांनी केले आहे.

नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी रंगराव पाटील कृषी उत्पन्न नवा आडत बाजार, नळेगाव रोड उदगीर या ठिकाणी संपर्क करावा. या संदर्भामध्ये काही तक्रार किंवा चौकशी करायची असेल तर शेतकऱ्यांनी ९४०५३४११०० किंवा९४०५६२११०० किंवा ९४०५६४११०० किंवा ९४२३७७५५७७, ९४०५४२०१०० या फोन नंबर वर संपर्क करावा, असेही आवाहन भास्करराव पाटील आणि शिवाजीराव गुरुडे यांनी केले आहे. नोंदणी १ मार्च २०२६ पासून सुरू होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी विना विलंब संपर्क करावा, असेही आवाहन केले आहे.

# बुधोडा येथे बाल आनंद बाजारातून ६ हजार दोनशे रुपयाची उलाढाल



लोकनेता न्यूज नेटवर्क

**औसा । महेश कोळी**

जि प प्रशाला बुधोडा येथे आज दि २८ फेब्रुवारी २०२६ रोजी खरी कमाई या अभिनव उपक्रमाचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना पैशांपेक्षा ज्ञान, संस्कार, शिस्त आणि प्रामाणिकपणाच खरी कमाई आहे, हा संदेश देणे हा होता.त्यामुळे मुलांनी विविध खानावळीचे स्टॉल लावले होते.जसे की पाणीपुरी, इडली , ढोकळा डाळ भात, फळे चहा कॉफी आईस्क्रीम भेळ शेंगदाणा लाडू चिक्की इत्यादी विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वतःच्या अनुभवातून सांगितले की, आमची हजारो रुपयांची उलाढाल होऊन आम्हाला चांगली सवय, वेळेचे महत्त्व आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत आहे. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह शाळेचे मुख्याध्यापक बिराजदार सर तसेच स्वामी मॅडम पवार मॅडम कछवा मॅडम कांबळे मॅडम खानापुरे मॅडम किंनिकर मॅडम पाटील मॅडम व पालकांचाही उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन चांगला नागरिक बनण्याची शपथ घेतली. या उपक्रमामुळे सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

# जि.प.प्रा.शाळा हरडफ येथे विज्ञान प्रदर्शन व बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर**

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हरडफ येथे विज्ञान प्रदर्शन व प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित विविध क्रीडा स्पर्धांचा भव्य बक्षीस वितरण सोहळा नुकताच संपन्न झाला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक कल्पकता आणि सुप्त गुणांना व्यासपीठ मिळाले.

प्रयोगांतून उलगडले विज्ञानाचे महत्त्व

या प्रदर्शनात शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध वैज्ञानिक प्रयोगांचे साहित्य व त्यामागील शास्त्रीय तत्त्वे प्रात्यक्षिकांसह समजावून सांगितली. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवत विविध नाविन्यपूर्ण प्रयोग सादर केले. उपस्थित पालक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या या प्रयोगांचे विशेष कौतुक केले.

मान्यवरांच्या हस्ते गौरव

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. पवन पाटील मोरे यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. कृष्णा पाटील हरडफकर, श्री. शिवाजीराव धावडकर, श्री. संदीप सूर्यवंशी, नितीन बोढारे, अविनाश मोरे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते क्रीडा व विज्ञान स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या प्रयोगांची पाहणी करून समाधान व्यक्त केले व सर्वांना विज्ञान दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

शिक्षकांचे परिश्रम

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका श्रीमती वंदनाताई पावडे, विज्ञान शिक्षक श्री. डी. एस. जीवने, श्री. वडजे सर, श्री. नरवाडे सर, श्री. चुनाळे सर, श्री. पवार सर, श्री. गुरमे सर व श्रीमती कदम मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. हा सोहळा विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीस तसेच त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला, अशी भावना यावेळी शिक्षकांनी व्यक्त केली.




## सरकारी अनुदानाचा असाही 'खो'; नऊ महिन्यांपासून शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

शासनाच्या वतीने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि शेतीकामात सुलभता आणण्यासाठी विविध अनुदान योजना राबविल्या जात आहेत. असे असले तरी तालुक्यात मात्र चित्र उलट दिसत आहे. गत अनेक महिन्यांपासून ठिबक सिंचन (स्पिंकलर) आणि कृषी यांत्रिकीकरणाचे अनुदान रखडले आहे. त्यामुळे स्वताची पदरमोड करून गुंतवणूक केलेले शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.




शासनाच्या उदासीन धोरणामुळे योजना मात्र केवळ नावापुरत्याच दिसत आहेत

पिकांसाठी पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा आणि मजुरीचा खर्च वाचावा या उद्देशाने अनेक शेतकऱ्यांनी स्पिंकलर प्रणाली बसवण्यासाठी अर्ज केले होते. शासनाकडून यासाठी एकूण १९ हजार ३५४ रुपयांचे अनुदान दोन हप्त्यांत (१३,३०६ आणि ६०४८) दिले जाते. २०२५-२६ या वर्षात लाभ घेतलेल्या सुमारे ५५० शेतकऱ्यांना अद्याप एक रुपयाही मिळालेला नाही. विशेष म्हणजे, या अनुदानासाठी शेतकरी गेल्या नऊ महिन्यांपासून कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. शेतीतील कष्ट कमी करण्यासाठी ट्रॅक्टर, रोटावेटर आणि इतर आधुनिक अवजारांसाठी कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत अनुदान मिळते. परंतु गत तीन महिन्यांपासून हे अनुदान रखडल्याने कर्जाचे हप्ते फेडायचे कसे? असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. आता सदर यांत्रिकीकरण योजनाही कागदावरच आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. खरीप हंगामात अतिवृष्टी आणि आता अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान केले.

योजनेचे असे आहे विवरण

ट्रॅक्टर
लाभार्थी
रोटावेटर
लाभार्थी
१,२५,००० रुपये अनुदान
६० लाभार्थी प्रतीक्षेत
४४,००० रुपये अनुदान
२० लाभार्थी प्रतीक्षेत

१५ दिवसांत खात्यावर अनुदान पडेल

ट्रॅक्टर व रोटावेटर यासाठी निधी उपलब्ध झाला आहे. या संदर्भातील प्रक्रिया सुरू केली आहे. पुढील १५ दिवसांत पात्र लाभार्थीच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा होईल. वरिष्ठ स्तरावरून अनुदान रक्कमेसाठी पाठपुरावा घेतला जात आहे.
चंद्रकांत नीमोड, तालुका कृषी अधिकारी, किनवट

## मांडवी ते आदिलाबाद राज्य मार्गावर जीवघणे खड्डे अपघाताचे प्रमाण वाढत आहे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पिपंळगाव मांडवी । डॉ.भारत उद्धव राठोड**

मांडवी ते आदिलाबाद राज्य मार्गावरील मांडवी पासून सरस विद्यालय पर्यंत तलाईगुडाआदिवासी आश्रम शाळा च्या समोर मोठ मोठाले जीव घेणे खड्डे पडले आहे रस्त्यावर अपघातीची मालिका सुरूच असून खड्ड्यामुळे वाहनधारकाचा जीव जाण्याचा वाट बघता का अशी संतप्त प्रतिक्रिया वाहनधारकांकडून होत आहे त्वरित खड्डे बुजूवून रस्ते दुरुस्ती करण्यात

यावी अशी मागणी होत आहे. या मार्गावरून क्षमतेपेक्षा जास्त

भारघेऊन आदिलाबाद ची केटीसी कंपनीचे हजारो जड वाहने भर वेगाने नागपूर येवतमाळ दररोज चालत असल्याने या रस्त्याची अक्षरशः चाळणी झालेली आहे विशेष करून दिव्य ज्योती संस्था ते सरस विद्यालय मांडवी पर्यंत च्या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्याने रोज अपघात घडत आहे त्या रस्त्यावर सरस विद्यालय, नेत्र रुग्णालय, अशोक पब्लिक स्कूल, जिल्हा परिषद हायस्कूल असल्याने हजार विद्यार्थी विद्यार्थी जीव मुठीत घेऊन या रस्त्यावरून प्रवास करतात.तालाईगुडा पिपंळगाव रोड समोर पण खूप मोठे खडे पडले आहे



याच रस्त्यावर मांडवी गावाच्या

नाल्याजवळ मोठा खड्डा पडला होता त्या खड्ड्यात तेलंगणातील अज्ञात दुचाकीचा अपघात झाला होता त्या अपघातात वाहन चालक गंभीर जखमी झाले होते त्यात त्याचा मृत्यू झाल्याची चर्चा आहे अपघातानंतर लगेच खड्डा बुजविण्यात आला भविष्यात कोणाचे जीव जाणार नाही याची खबरदारी घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्वरित खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त करण्याची मागणी होत आहे.

## गडचांदूर प्रदूषण प्रकरण तापले!
## माणिकगड सिमेंट कंपनीवर तात्काळ कारवाईची आमदार सुधाकर अडबाले यांची जोरदार मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । सिध्देश्वर केंद्रे**

गडचांदूर शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या प्रश्नावर विधानसभेत जोरदार आवाज उठवत आमदार सुधाकर अडबाले यांनी माणिकगड सिमेंट कंपनीवर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली. तारांकित प्रश्नाद्वारे त्यांनी नागरिकांच्या आरोग्याशी होत असलेल्या गंभीर खेळाकडे शासनाचे लक्ष वेधले.आमदार अडबाले यांनी सभागृहात सांगितले की, सिमेंट उद्योगात इंधन म्हणून घनकचऱ्याचा वापर केला जात असून त्याची साठवण शहरालगत करण्यात येत आहे. त्यामुळे निर्माण होणारी दुर्गंधी व धुरामुळे सुमारे एक किलोमीटर परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. घरांमध्ये धूळ साचणे, श्वसनाचे आजार वाढणे अशा तक्रारी सातत्याने येत आहेत.



नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर असताना प्रशासनाने नेमकी कोणती कारवाई केली? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. डम्पिंग यार्ड शहराबाहेर हलविण्याबाबत निर्णय घेणार का? तसेच प्रदूषण करणाऱ्या कंपनीवर कठोर दंडात्मक कारवाई होणार का? असे प्रश्नही त्यांनी उपस्थित केले.यावर उत्तर देताना संबंधित मंत्र्यांनी सांगितले की, तक्रारींच्या अनुषंगाने यापूर्वीही कंपनीला नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. २०२२ मध्ये सुमारे ५० लाखांचा दंड आकारण्यात आला होता. २०२४-२५ दरम्यान पुन्हा १५ लाखांचा दंड वसूल करण्यात आला असून प्रदूषण नियंत्रणासाठी नियमित तपासणी व हवा गुणवत्ता परीक्षण सुरू आहे.तसेच, पुन्हा तक्रारी आल्यास तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.दरम्यान, डम्पिंग यार्ड स्थलांतराचा निर्णय हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारित असल्याचे स्पष्ट करण्यात आले. उद्योगाकडून पर्यावरण नियमांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले असून नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड केली जाणार नाही, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

## संगत बिघडली की जीवनाची रंगत बिघडते म्हणून संगत चांगली ठेवा-पुज्य स्वामी गजेंद्र चैतन्यजी महाराज

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

*माणसाची संगत बिघडली की जीवनाची रंगत बिघडते म्हणून सदैव संगत चांगल्या लोकांचीच ठेवा.*परम पूज्य बालयोगी स्वामी गजेंद्र चैतन्य जी महाराज यांनी मौजे हाळदा येथे सुरू असलेल्या श्री शिव महापुराण कथेतून बोलताना केले.



पुढे बोलताना सांगितले की जीवनात सदैव चांगल्याची संगत करा चुकूनही वाईट लोकांची संगत करू नका कारण वाईट लोकांची संगत लागली की माणसाच्या जीवनाचे अध:पतन सुरू होते आणि माणूस रसातळाला जातो. शास्त्रातील व पुराणातील अनेक दाखले देऊन वाईट संगती मुळे मी मी म्हणणारे ऋषीमुनी सुद्धा अध:पतीत झाले तेव्हा आपण कलियुगातले मानव आहोत.म्हणून संगत करायची असेल तर संतांची करा कारण संतांचे संगती मनो मार्गगती; अकळावा श्रीपती येणे पंथे ।। संतांच्या संगतीत मनाला, बुद्धीला चांगले वळण लागते आणि माणूस हा उन्नत जीवन जगतो.जीवनात एकवेळ पंगत चुकली तरी चालेल पण संगत चुकू देऊ नका कारण म्हणतात ना ढवळ्याशेजारी बांधला पवळा वाण नाही पण गुण लागला ते सत्य आहे. ढेकणाच्या संगे हिरा तो भंगला,कुसंगे नाडला साधू जैसा ।। साधु पुरुषही चुकून एखाद्या वाईट व्यक्तीच्या संगतीला लागला तर तोही अध:पतीत होतो. म्हणून जीवनात संगत चांगल्याची करा,चांगले जीवन जगा.संत साहित्याचा अभ्यास करा.कारण त्याने जीवनाची दशा व दिशा बदलते.चांगले संस्कार मिळतात आणि या मनुष्य जन्माचे खरे मर्म आपल्याला कळते. मानव जन्म पुन्हा पुन्हा मिळत नाही म्हणून मिळालेल्या जन्माचे चांगल्यांच्या संगतीत राहून सार्थक करा.असा मौलिक उपदेश त्यांनी आपल्या शिव महापुराण कथेतून बोलताना उपस्थित हजारो भाविक भक्तांना केला.

शिव महापुराण कथा ही मंगलमयी, पुण्यदायी कथा असून ती भक्तीभावाने श्रवण केल्यास जीवनातील सर्व व्यथा दूर करते एवढे सामर्थ्य या शिव कथेत आहे.तेव्हा सर्वांनी ही शिव कथा भक्ती भावाने श्रवण करून केलेल्या उपदेशाप्रमाणे आचरण करा असे सांगितले. या शिव महापुराण कथेला हळदा व हळदा परिसरातील हजारो भाविक भक्त व माता भगीणी हजर राहून कथेचा आस्वाद घेत आहेत.


## स्मार्ट मीटर ग्राहकांकडे विज बिल बाकी असल्यास थेट कार्यालयातून रिमोट प्रणाली द्वारे वीजपुरवठा खंडित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

आडुळ परिसरातील १०० हून अधिक वीज ग्राहकांना महावितरणनाने मोठा दणका दिला आहे अडुळ उपकेंद्र अंतर्गत येणाऱ्या अनेक गावांमध्ये केवळ एका महिन्याचे वीज बिल थकीस असलेल्या ग्राहकांचा वीजपुरवठा अचानक खंडित करण्यात आल्याने नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे

वाढत्या वीज बिल थकबाकीच्या पार्श्वभूमीवर महावितरणने ऑटो डिस्कनेक्शन मोहीम सुरू केली आहे ज्या ग्राहकाकडे स्मार्ट मीटर बसण्यात आले आहेत त्यांचा वीजपुरवठा थकबाकी असल्यास थेट कार्यालयातूनच रिमोट प्रणाली द्वारे तात्काळ खंडित केला जात आहे त्यामुळे कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष जाऊन



वीज कनेक्शन तोडण्याची आवश्यकता उरलेली नाही स्मार्ट मीटर प्रणालीमुळे थकीत बिल असलेल्या ग्राहकांचा वीज पुरवठा काही क्षणात बंद केला जातो अनेक ग्राहकांना एका महिन्याची थकबाकी भरण्यासाठी १५ दिवसांची पूर्व सूचना मिळाली होती मात्र आर्थिक अडचणीमुळे बिल न भरता आल्याने ४५ व्या दिवशी त्यांचे कनेक्शन बंद करण्यात आले

विशेष म्हणजे थकबाकीची संपूर्ण रक्कम भरल्यानंतर संबंधित ग्राहकांचा वीज पुरवठा आपोआपच पुन्हा सुरू होतो त्यामुळे बिल भरल्यानंतर कार्यालयीन विलंब होत नसल्याचा दावा महावितरण केला आहे

**ग्रामीण भागात तीव्र नाराजी**

आडुळ उपकेंद्रा अंतर्गत येणाऱ्या ३० ते ३५ गावांमधील शेतकरी व सर्वसामान्य ग्राहकांमध्ये या धडक कार्यवाही बाबत नाराजी व्यक्त होत आहे शेतीपंप घरगुती वापर आणि लहान व्यवसायावर याचा थेट परिणाम होत आहे अंदाजे बिल आकारणी व आर्थिक अडचण आणि त्यामुळे थकबाकी वाढल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे त्यामुळे विज बिल भरण्याची थोडी मुदत वाढून द्यावी अशी मागणी सर्वसामान्य जनतेमधून जोर धरत आहे

वाढती थकबाकी कमी करण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत असून नियमित बिल भरणाऱ्या ग्राहकावर अन्याय होऊ नये हा या मागचा मुख्य उद्देश आहे ग्राहकांनी बिल वेळेत भरावे अन्यथा स्मार्ट मीटर द्वारे वीजपुरवठा खंडित केला जाईल गेल्या तीन दिवसात शंभरहून अधिक ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे

**-सचिन हरकल**
**कनिष्ठ अभियंता,महावितरण आडुळ**

## तुळजाभवानी मातेच्या चरणी नतमस्तक होऊन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री कै.अजितदादा पवार यांच्या आत्म्यास शांती लाभो यासाठी प्रार्थना करतेवेळी देगलुरचे सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री कै अजितदादा पवार यांच्या आत्म्यास शांती लाभो याकरिता तुळजापूर येथे आई तुळजाभवानी मातेच्या चरणी नतमस्तक होऊन प्रार्थना करतेवेळी देगलुरचे सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री कै अजितदादा पवार यांनी महाराष्ट्र राज्याच्या मायबाप जनतेसाठी अनेक प्रश्न मार्गी लावण्यामध्ये त्यांचे खुप मोठे योगदान आहे असे सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी सांगितले अजितदादा पवार हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा असले तरी ते अनेक पक्षांच्या कार्यकर्त्यांचा कामाला धाऊन जाणारं नेतृत्व होते दादा नेहमी बोलायचे कमी मात्र काम दुप्पटीने करायचे आणि महाराष्ट्र राज्याच्या सर्वाधिक कार्यकाळातील उपमुख्यमंत्री पदी राहण्याचा मान हे फक्त अजितदादा पवार यांनाच मिळालाय या अश्या लाडक्या नेत्याला आदरांजली वाहिली व तिरुपती बालाजी भगवान यांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांच्या आत्म्यास शांती लाभो याकरिता,प्रार्थना केली,व तसेच आज तुळजापुर



येथे आई तुळजाभवानी मातेच्या चरणी नतमस्तक होऊन प्रार्थना केली की कै अजितदादा पवार यांच्या आत्म्यास शांती लाभण्याकरती प्रार्थना केल्याचे देगलूरचे सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी सांगितले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933